आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता
४ मार्च २०२५ मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारत हे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी विकासाचं इंजिन बनल्याचं प्रधानमंत्र्यांचं अर्थसंकल्पानंतरच्या वेबिनारमध्ये प्रतिपादन

- अबु आझमी यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून महाराष्ट्राच्या विधानसभेत गदारोळ, दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- महाराष्ट्राचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा

- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची कॅनडा आणि मेक्सिकोवर २५ टक्के तर चीनवर २० टक्के आयात शुल्क आकारण्याची घोषणा

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ऑस्ट्रेलियाबरोबर होणार

**<><><><><>**

भारत हे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी विकासाचं इंजिन बनल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. केंद्रीय अर्थसंकल्पानंतरच्या वेबिनारमध्ये ते बोलत होते. कोविड सारख्या महामारीच्या काळात जेव्हा जागतिक अर्थव्यवस्थेत मंदी आली होती, तेव्हा भारतानेच अर्थव्यवस्थेला गती दिली, आपल्या आत्मनिर्भर भारत या धोरणामुळेच हे घडल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. भारत हा उच्च दर्जाचं उत्पादन करणारा आणि उत्तम पुरवठादार देश आहे. त्यामुळे जगभरात मागणी असलेल्या उत्पादनांची निर्मिती करण्याचं आवाहनही प्रधानमंत्र्यांनी केलं.

अर्थसंकल्पीय घोषणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि त्यासाठीचे प्रयत्न अधोरेखित करण्यासाठी या वेबिनारचं आयोजन करण्यात आलं आहे. हे वेबिनार सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या वाढीसाठी उपयुक्त योजना, उत्पादन, निर्यात आणि अणुऊर्जा मोहिमा तसंच गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभतेमध्ये सुधारणा या विषयावर आयोजित करण्यात आले आहेत. या वेबिनारच्या माध्यमातून सरकारी अधिकारी, उद्योग क्षेत्रातले मान्यवर आणि व्यापार तज्ज्ञांना भारताच्या औद्योगिक, व्यापार आणि ऊर्जा धोरणांवर चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ मिळणार आहे.

**<><><><><>**

भारताच्या दौऱ्यावर असलेल्या बेल्जियमच्या राजकन्या ॲस्ट्रिड आज नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. त्या आठ मार्चपर्यंत भारताच्या दौऱ्यावर आहेत. राजकन्या ॲस्ट्रिड यांनी बेल्जियमचे संरक्षणमंत्री थियो फ्रँकस्केन यांच्यासमवेत काल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली. त्यांनी दोन्ही देशांमधील संरक्षण औद्योगिक सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा केली.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशीचं कामकाज सत्ताधारी पक्षांच्या आमदारांच्या गदारोळानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. विधानसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा समाजवादी पार्टीचे आमदार अबु आझमी यांच्या राजीनाम्याची मागणी करत सत्ताधारी आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. आझमी यांनी मुघल शासक औरंगजेब याच्या समर्थनार्थ वक्तव्य केल्याचा आरोप करत सत्ताधारी आमदार महेश लांडगे, अतुल भातखळकर, गुलाबराव पाटील, सुधीर मुनगंटीवार यांनी केली. गदारोळ वाढल्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं होतं. कामकाज सुरू झाल्यानंतर उद्योग मंत्री उदय सामंत यांनीही आझमी यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अबु आझमी हे देशद्रोही असून त्यांचं निलंबन करण्याची मागणी केली. आझमी यांनी वारंवार छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केला आहे, असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट... एकनाथ शिंदे ....**

अबू आझमी यांच्या वक्तव्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेतही निवेदन केलं. यावर सरकारने कारवाई करावी असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिले. त्यानंतरही सत्ताधारी आमदारांनी घोषणाबाजी सुरू ठेवल्यानं सभापतींनी कामकाज १५ मिनिटांसाठी तहकूब केलं.

कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेसचे भाई जगताप यांनी प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांच्यावरही कठोर कारवाई करण्याची मागणी केली. महापुरुषांचा अवमान करणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई करावी असे निर्देश सभापती राम शिंदे यांनी सरकारला दिले. सत्ताधारी सदस्यांचं आंदोलन सुरूच असल्याने सभापतींनी कामकाज उद्यापर्यंत तहकूब केलं.

**<><><><><>**

मुघल शासक औरंगजेबाचा बचाव करणारं वक्तव्य केल्याप्रकरणी समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि आमदार अबू आझमी यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनाच्या प्रारंभी मुंबईत पत्रकारांशी बोलताना आझमी यांनी हे वक्तव्य केल्यानं हा वाद निर्माण झाला होता. या वक्तव्यानंतर शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी ठाण्याच्या वागळे इस्टेट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या या वक्तव्यावरून सर्वत्र वाद निर्माण झाला असून त्यांच्यावर जोरदार टीका करण्यात येत आहे.

**<><><><><>**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी आपला राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याकडे सुपूर्द केला आहे.

नैतिकतेला धरुन आणि तब्येत ठीक नसल्यानं राजीनामा दिल्याचं धनंजय मुंडे यांनी समाज माध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

मुंडे यांचा राजीनामा स्वीकारला असून पुढील कार्यवाहीसाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे पाठवला आहे असं फडनवीस यांनी विधानभवनात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातले आरोपी मुंडे यांचे निकटवर्तीय असल्याचा आरोप आहे. त्यामुळे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील आणि भाजपचे आमदार सुरेश धस यांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.

दरम्यान, संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातल्या आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, या मागणीसाठी आज बीड जिल्हा बंदचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अतिशय क्रूरपणे करण्यात आली असून नैतिकता म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामे द्यावेत अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला म्हणजे झालं असं नाही, मुख्यमंत्र्यांनी त्यांना बडतर्फ का केलं नाही हा प्रश्न आहे, असं सपकाळ म्हणाले. सरकार मुंडेंना वाचवायचा प्रयत्न करत होतं असा आरोप सपकाळ यांनी केला.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडा आणि मेक्सिकोवर २५ टक्के तर चीनवर २० टक्के आयात शुल्क आकारण्याची घोषणा केली आहे. हे शुल्क आजपासून लागू झालं आहे. कॅनडाने १५० अब्ज डॉलर्सच्या अमेरिकी वस्तूंवर २५ टक्के कर लादणार असल्याचं म्हटलं आहे. चीनने अमेरिकेच्या कृषी आयातीवर १० ते १५ टक्के कर लावण्याची घोषणा केली असून मेक्सिकोनेही

प्रत्युत्तर देण्याचा निर्धार केला आहे. या करांमुळे कॅनडा आणि मेक्सिकोतून अमेरिकेत येणारे अंमली पदार्थ आणि स्थलांतरितांना आळा घालण्यासाठी अधिक कारवाई करता येणार असल्याचं ट्रम्प म्हणाले. या वाढत्या व्यापार युद्धाच्या शक्यतेमुळे अमेरिकन ग्राहकांना किराणा, इलेक्ट्रॉनिक्स आणि ऑटोमोबाइलसह काही उत्पादनांसाठी जास्त किंमत मोजावी लागेल असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. दरम्यान अमेरिकेच्या शेअर बाजारात घसरण झाली असून व्यापारयुद्धाच्या शक्यतेमुळे आशियाई बाजारात अस्वस्थता आहे.

**<><><><><>**

इस्त्रायलनं तार्तुसजवळच्या सीरियाच्या हवाई संरक्षण बटालियनवर हवाई हल्ले केले आहेत. कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नसल्याचं सीरियाच्या सरकारी माध्यमांनी म्हटलं आहे. नुकसानीचा आढावा घेण्यासाठी सिरियन सिव्हिल डिफेन्सची पथकं तैनात करण्यात आली आहेत. इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी दक्षिण सीरियाचं लष्करीकरण करण्याचं आवाहन केलं आहे, तर सीरियाचे हंगामी अध्यक्ष अहमद अल शारा यांनी नवीन सरकारला इस्त्रायलशी संघर्ष नको असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रियाच्या फेडरल चान्सलर पदाची शपथ घेतल्याबद्दल ख्रिश्चन स्टॉकर यांचं अभिनंदन केलं आहे. भारत-ऑस्ट्रिया भागीदारी सातत्यानं प्रगती करणार असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. दोन्ही देशांचे परस्पर सहकार्य अभूतपूर्व उंचीवर नेण्यासाठी त्यांच्यासोबत काम करण्यास आपण उत्सुक असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ऑस्ट्रेलियाबरोबर होणार आहे. दुबई इथे दुपारी अडीच वाजता हा सामना सुरू

होईल. रविवारी दुबई इथे झालेल्या शेवटच्या साखळी सामन्यात भारतीय संघाने न्यूझिलंडच्या संघाचा ४४ धावांनी पराभव केला होता आणि अ गटातून उपांत्य फेरीत धडक दिली. या स्पर्धेतल्या उपांत्य फेरीचा दुसरा सामना उद्या लाहोर इथे न्यूझिलंड आणि दक्षिण आफ्रिका या संघामध्ये होणार आहे. दोन्ही सामन्यांतून विजेते ठरलेले संघ येत्या ९ तारखेला अंतिम सामना खेळतील.

**<><><><><>**

सेबीच्या माजी अध्यक्ष माधवी पुरी बुच यांच्यासह इतर पाच जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याच्या विशेष न्यायालयाच्या आदेशाला आज मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. विशेष न्यायाधीश एस. ई. बांगर यांनी माधवी पुरी बुच यांच्यासह इतर पाच जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचे आदेश शनिवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिले होते.

**//<><><><><>//**